स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडाविद्यापीठनांदेड

अंतर्गत

मराठी विषयात पीएच.डी. पदवीसाठी

सादरकरावयाच्या शोधप्रबंधाचा

संशोधन आराखडा

शिर्षक

समकालीननिवडक बाल साहित्यः एकचिकित्सक अभ्यास

(कालखंड :१९८० ते आजतागायत)

संशोधक

प्रा.सदाशिवगंगाधरचुकेवाड

बॅ. बाळासाहेब खर्डेकर महाविद्यालय, वेंगुर्ला

जि.सिंधुदुर्ग

मार्गदर्शक

प्रा.डॉ. उज्वला शिवरामजगताप

संशोधक मार्गदर्शक व मराठी प्रमुख

शारदा महाविद्यालय, परभणी

संशोधन केंद्र

भाषा, वाड्मय व संस्कृती अभ्यास संकुल

स्वा.रा.ती.म.वि. नांदेड

ऑगस्ट,२०१७

प्रति,
मा. संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,
स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडाविद्यापीठ, नांदेड.

विषयः- सुधारीत संशोधन आराखडादाखलकरणेबाबत.
संदर्भः- संशोधन आणि मान्यता समिती बैठकदिनांक १८ फेब्रूवारी, २०१६

महोदय,

दिनांक १८ फेब्रूवारी२०१६ रोजी संपन्नझालेल्या संशोधन विषय मान्यता समितीच्या (आर.आर.सी.) तज्ञ सदस्यांच्या सूचनेनुसार, तसेच माझ्या पी.एच.डी. संशोधन कार्यासाठी नेमून दिलेल्या संशोधन मार्गदर्शक प्रा. डॉ. उज्वला शिवराम जगताप यांच्या मार्गदर्शना नुसार ' समकालीन निवडक बाल साहित्यः एक चिकित्सक अभ्यास' (कालखंड १९८० ते आजतागायत) या विषयांवरील संशोधन आराखडा सादरकरीत आहे.

तरी स्वीकारकरावा ही विनंती.

आपला विश्वासु

प्रा.सदाशिव गंगाधर चुकेवाड
बॅ. बाळासाहेब खर्डेकर महाविदयालय,
वेंगुर्ला जि.सिंधुदुर्ग

<u>समकालीननिवडक बालसाहित्यः एकचिकित्सक अभ्यास</u>

(कालखंड : १९८० ते आजतागायत)

१) प्रस्तावना :

मराठी साहित्यनिर्मितीलाएक संपन्न असा वारसाआहे. मराठीतील आद्यकवी मुकुंदराजापासूनते महानुभावपंथीयग्रंथकारज्ञानेश्वर,नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास, दासोपंतापर्यंत आणि वामन पंडितापासूनते बखरकारांपर्यंत प्राचीन काळातील साहित्य निर्मितीकारांचा या संदर्भात उल्लेखकरता येईल. या काळातील संतांनी, पंडितांनी आणि बखरकारांनी आपापल्यापरीने मराठी भाषा आणि साहित्य समृध्दकेले आहे. प्राचीन काळ ते आजपर्यंत मराठी साहित्याची अभिव्यक्ती आशय आणि स्वरूप सातत्याने बदलतगेलेले आपणांसदिसते म्हणूनच साहित्य हे परिवर्तनीय आहे.त्यात्या काळातील साहित्यातून येणारे समाजजीवन, भाषाजीवनजगण्याची पध्दती, काळानुसार निर्माणझालेले सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक प्रश्न आणि परिस्थिती यावर जसा प्रकाश पडतोतसेच काळाच्या गरजेतूनही साहित्यनिर्मिती होत असल्याचे लक्षात येते.

आधुनिक मराठी वाड्मयाचा प्रारंभ साधारणपणे १८१८ पासून ग्रहित धरण्यात येतो.त्यातही स्वातंत्र्यपूर्व कालखंड आणि स्वातंत्र्योत्तरकालखंड असे दोन भाग पाडलेजातात. ‘अव्वल इंग्रजी कालखंड’ असेही संबोधलेजाते. या अव्वल इंग्रजी काळात वैचारिकनिबंधाच्या रूपाने मराठी साहित्याचा उदय झाला. नंतरकविता, कथा, कादंबरी, चरित्र आणिनाटक यासारख्या आधुनिक समजल्या.

जाणाऱ्या साहित्य प्रकारांचीनिर्मिती होत गेली. १९४५ नंतरदुसऱ्या महायुध्दाचे समाजात अनेकविविध परिणाम झाले.त्यामुळे माणसाच्या मनोवृत्तीत बदलझाले. त्यांच्या पारंपरिक मूल्यांनाहादरे बसून भय, असुरक्षितताशुद्रवृत्ती, अंधश्रध्दा आणि स्वार्थयातून सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक या नव्या मूल्यांनी समाजमनाची पकड घेतली. याचे प्रतिबिंब साहजिकच साहित्यातून पडू लागले. माणसांचे अस्तित्वचधोक्यात आणू पाहणाऱ्याबदलत्यानवजीवनाकडे आशाळभूतपणेआणि भयभीतपणे पाहणाऱ्या माणसांचेचित्रणनवकथाकारांनीकेले. गंगाधर गाडगीळ,अरविंदगोखले, पु.भा.भावे या कथाकारांनीनवकथेच्याजडणघडणीत मोलाचे योगदानकेले.त्याच प्रमाणे श्री.ना.पेंडसे, अण्णाभाऊ साठे, शंकररावखरात व इतरग्रामीण लेखकांनी मराठी साहित्याचे क्षेत्र व्यापककेले.परंतु १९४५ नंतरच्याकालखंडातजेनवीन प्रयोग होत गेलेत्याचाविकास १९६० नंतरच्या काळात होत राहिला.

'चक्र', 'महिमची खाडी', 'धग',व 'माणूस' अशा कादंबऱ्यामुळे साहित्याच्याकक्षेतजीवनाचा मोठा प्रदेश येतगेला. एकूणच या कालखंडात सर्वच साहित्य जीवनसन्मुख झाल्याचे पाहावयास मिळते.ज्या प्रश्नांनी माणासाला वेढले, ज्यामुळे माणसांच्यावाट्यालादु:ख येत होते. त्याचा वेध म्हणजे १९६० नंतरच्या साहित्याने घेतला. लेखकांनी साहित्याला अधिक परिपूर्ण आणि समृध्दकेले.रंजक व करमणूकप्रधान साहित्याची परंपरा मोडून सरळ जीवनाचा वेधघेणारेग्रामीण साहित्य याच काळात निर्माण होऊ लागले.१९७५ नंतरग्रामीण साहित्याची चळवळ व दलित साहित्याची चळवळ उदयास आली. अशा चळवळीतून ग्रामीण साहित्य,दलित साहित्य,जनवादी साहित्य,आदिवासी साहित्य आणि स्त्रीवादी साहित्य असेअनेक साहित्यप्रवाह मराठी साहित्यात निर्माण होऊ लागले. अशा अनेक साहित्यप्रवाहात बालसाहित्य हा साहित्यप्रकार ही पुढे रूढ झाल्याचेदिसते.

बालसाहित्य हे बालकांसाठी लिहिले जाते. बालसाहित्यातून बालमनावर संस्कारघडविण्याचेदुरगामी उध्दीष्ट लेखकाच्या मनात असते. बालसाहित्याची सुरूवात 'इसापनिती', 'पंत्रतंत्र' व 'बालबोध मुक्तावली' पासून म्हणजे इंग्रजी राजवटीच्या काळात झाली असली तरीइतर साहित्य प्रकारांच्यातुलनेत बालसाहित्य तुरळक प्रमाणातच लिहले जात असल्याचे पाहावयास मिळ्ते. अलिकडच्या काळात मात्र बालसाहित्याचे स्वरूप बदलले आहे. चित्रे रेखाटणे आणि मुलांची भाषा यातून बालसाहित्याची निर्मिती होत आहे. त्यामुळे आधुनिक काळात बालसाहित्यालाही साहित्याच्या क्षेत्रात विशेष स्थान मिळू लागले आहे. या संदर्भात**'चिंटू'** हीचित्रमालिका**'राधेचघर','आमची शाळा'** (माधुरी पुरंदरे) ही लहान मुलांची पुस्तके वेशिष्ट्यपूर्ण आहेत. सानेगुरूजींचे'**श्यामची आई'** भ.रा.भागवतांचा'**फास्टर फेणे'**, दिलीप प्रभावळकरांचा '**बोक्या सातबंडे'** आज ही लोकप्रिय होत आहेत.याच बालसाहित्याच्या संदर्भात १९८० नंतरच्या बालसाहित्यात समकालीन बालसाहित्य तितकेच महत्वपुर्ण आहे असे लक्षात येते म्हणूनच येथे समकालीननिवडक बालसाहित्याचा अभ्यास करण्याचे योजिले आहे .

निवडक बालसाहित्यकारांच्या समकालीन लेखनामध्ये भगवान अंजनीकर, रेणू पाचपोर,सुरेश सावंत, माधवरावचुकेवाड,देविदास फुलारी , बबनशिंदे,श.ल.नाईक ,रमेशचिले,बाबा भांड, केशव वसेकर, अनुताई वाघ, वृधा निमये, भा.दो. पाटील, फ.मु.शिंदे महाविर जोंधळे, रत्नाकर मतकरी आणि इतर काही साहित्यकारांचा सन्मानाने उल्लेखकेलाजातो.त्यांनीकथा,कविता व इतर साहित्य प्रकारामध्ये लेखनकेले आहे.त्यांनी या साहित्यामधुन बालमनातीलनिरागसविचार आणि मनोविश्व साकारले आहे . या विचारांनादिशादेणारे साहित्य समकालीन निवडक बाल साहित्यिकानी निर्माणकेले आहे.

२) समस्येचे स्वरूपः

१९८० नंतरच्या बालसाहित्यातकथा, कविता, नाटक व कादंबरी अशा विविध वाङ्मय प्रकारात लेखन होत आहे. या संशोधनाच्यानिमित्ताने १९८०नंतरच्या समकालीननिवडक बालासाहित्यातून मुलांची संवेदनक्षमताकशीजागृत होते?किंवात्याचे बालसाहित्य निसर्गाशी ओळ्ख करूनदेतादेता आपलेनिसर्गाशीनातेकसेजोडते, याचा अभ्यास करावयाचा आहे. त्याचप्रमाणे समकालीननिवडक बालसाहित्य वास्तवजीवनाशी संवाद साधतेकाय? आणि साधत असल्यास त्यातून मुलांचा मानसिकविकास होण्यास मदत होते का? याचा परामर्श संशोधनाच्यानिमित्तानेघेता येईल.

आजच्या जागतिकीकरणाच्या काळात बालसाहित्याचे आयाम बदलतचालले आहेत. कारण मुलांभोवतीचे विश्वच झपाट्याने बदलत आहे.त्यांची जगण्याची परिभाषा बदलत आहे. अशा बदलांची समकालीननिवडक बाल साहित्यानेनोंदघेतली आहे काय ?याचा अभ्यास संशोधनाच्यानिमित्तानेकरता येईल.तसेच बालसाहिल्याचे शिशुगट,कुमारवयीन गट आणि किशोरवयीन गट असे वर्गीकरण केले जाते तेव्हा अशा वर्गीकरणानुसार बालकांच्या बौध्दीक विचारांची पातळी कशी उंचावत जाते ? याचा अभ्यास मानसशास्त्रीय दृष्टीकोणातून करता येईल.

३) अभ्युपगम (गृहितके):

समकालीननिवडक बालसाहित्य वेगवेगळ्या साहित्य प्रकारातील साहित्यिकांच्या योगदानामुळे समृध्दझालेले आहे.

असे गृहित धरले आहे की, भगवान अंजनीकर,रेणू पाचपोर, सुरेश सावंत, माधवराव चुकेवाड,देविदास फुलारी, बबनशिंदे,श.ल.नाईक. रमेशचिले,बाबा भांड,केशववसेकर,अनुताई

वाघ,वृधा निमये,भा.दो.पाटील,फ.मु.शिंदे, महाविर जोंधळे, रत्नाकर मतकरी आणिइतर काही लेखकांनी१९८० नंतर मराठी बाल साहित्यामध्ये मोलाची भर टाकून बालसाहित्य समृध्दकेले आहे.

बालसाहित्य हे वास्तवजीवनाशी सुसंगतकिंवा संवाद साधणारे असते यातून बालकांच्या मानसिक व बोध्दिकविकासाला प्रेरणा मिळते.

जागतिकीकरणाच्या काळात समाजातझपाट्याने बदलघडत आहेत. त्या बदलांचा बालमानसिकतेवर परिणाम होत असल्यामुळे बालसाहित्याचे आयाम बदलत आहेत.

४) संशोधन पध्दती:

संशोधनासाठी पृथक्करणात्मक,मूल्यमापनात्मक, तुलनात्मक,आणि समिक्षात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. अभ्यासासाठी समकालीननिवडक बालसाहित्यिकांच्या निवडक सहित्याची निवड करण्यात येईल. विविध प्रकारानुसार समकालीननिवडक बालसाहित्याचे शिशुगट, कुमारवयीन गट आणि किशोरवयीन गट या प्रमाणे विवेचन व विश्लेषण करण्याचे प्रयोजनआहे.

५) संशोधनाचे उददेश:

१.समकालीननिवडक बालसाहित्यांच्या साहित्यातील बहूआयामी घटकांचा अभ्यास करणे.

२.मराठीकाव्य वाङ्मय प्रकारासंदर्भात समकालीननिवडक बालसाहित्याच्या सहित्याचे वेगळेपण अधोरेखितकरणे.

३.समकालीननिवडक बालसाहित्य प्रकारांवर प्रकाश टाकणे.

४. समकालीननिवडक बाल सहित्यातून बालकांच्या मनोविश्वाचा वेधघेणे.

५. समकालीननिवडक बालसाहित्याच्या लेखनाची साहित्य मुल्याच्या दृष्टिनेनोंदघेणे.

६. समकालीननिवडक बालसाहित्यिकांच्या साहित्यात असलेला फरक पृथकरणात्मक, मुल्यमापनात्मक, तुलनात्मक आणि समिक्षात्मक पध्दतीने मांडणे.

६) संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादाः

समकालीननिवडक बालसाहित्यः एकचिकित्सक अभ्यास' या विषयावर संशोधनकरतानाप्रथम समकालीन या शब्दाची व्याप्ती व मर्यादा स्पष्ट करणे आवश्यक वाटते.

समकालीन संशोधनकरताना विशिष्टकालखंडातील साहित्याचा अभ्यास करणेकिंवा साहित्यकृती समकालीननसल्या तरीत्या समकालीनांचे प्रतिनिधित्वकरतातका?कोणत्या संदर्भात?याचा अभ्यास करणेकिंवा समकालीननिवडक साहित्यातील समानजाणिवांचा शोधघेणे अशा विविध पध्दतीने'समकालीननिवडक बालसाहित्याचाएक चिकित्सक अभ्यास'होऊ शकतो.यासंशोधनात १९८० नंतरच्या बालसाहित्याचा अभ्यास करण्याचेनिश्चितकरून समकालीन साहित्यातील समानजाणिवा, बालमनोविश्व, आशय अभिव्यक्ती, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय परिस्थीती मुळे समाजात होणारे परिवर्तन व निवेदन आणि भाषा शैली अशी मांडणीकरून संशोधनकेले जाईल.

या संशोधनात समकालीन साहित्य निवडताना व्यापक प्रमाणावर लवचिकता राहील. तव्दतच समकालीननिवडक बालसाहित्याचे समग्र साहित्य विचारातघेतले जाईल.

७) संशोधनाचेज्ञान शाखेस होणारे योगदानः

बालसाहित्य हे मुलांच्या ज्ञानसंवर्धनातीलएक घटक आहे. बालसाहित्यामुळे मुलांमधील जिज्ञासा, सुक्ष्मनिरीक्षण, संवेदनक्षमता, व्यवहारज्ञान आणिनिर्णयक्षमता अशा अनेक

गुणांचाविकास होत असतो. या संशोधनाचाउपयोग बालकांच्याकल्पनाशक्तीच्याविकासासाठी आणि सामाजिक वास्तवातुन कळत नकळत होणाऱ्या संस्कारासाठी होऊ शकेल.

समकालीननिवडक बालसाहित्यिकाच्या कविता, कथा व नाटक या साहित्यप्रकारातून आजच्या काळातील बालकांचा मानसिक व कल्पनाशक्तीचाविकास होईल.

८) प्रकरणांचीविभागणी:

प्रकरण पहिले

१) प्रस्तावना

साहित्य प्रकारांच्या मुळ संकल्पना, समकालीन साहित्य व बालसाहित्य संकल्पना, इत्यादींचे स्वरूप, व्याप्ती आणि समकालीन साहित्याचे मापदंड इ. अभ्यास.

२) बाल नाटक, बाल कविता, बाल कथांचा आढावा.

३) समकालीन बाल कथा, बाल कविता आणि बाल नाटकइत्यादीचा आढावा.

प्रकरणदुसरे

समकालीन निवडक बालसाहित्यिकाच्या कथांचा अभ्यास.

या प्रकरणात समकालीन असणाऱ्या भगवान अंजनीकर, रेणु पाचपोर, सुरेश सावंत माधव चुकेवाड, देविदास फुलारी, बबन शिंदे, श.ल.नाईक, रमेश चिल्ले, बाबा भांड, केशव वसेकर इत्यादी बालसाहित्यिकारांच्या १९८० ते आजतागायत बाल कथांचा अभ्यास करावयाचे योजिले आहे.

प्रकरणतिसरे

समकालीन निवडक बालसाहित्यिकाच्या कवितांचा अभ्यास.

या प्रकरणात समकालीन असणाऱ्या अनुताई वाघ, वृधा निमये, फ.मु.शिंदे, भगवान अंजनीकर, रेणु पाचपोर, सुरेश सावंत माधव चुकेवाड, देविदास फुलारी, बबन शिंदे, श.ल.नाईक, रमेश चिल्ले, बाबा भांड, केशव वसेकर इत्यादी बाल बालसाहित्यिकाच्या १९८० ते आजतागायत समग्र बाल कवितांचा अभ्यास करावयाचे प्रयोजन आहे.

प्रकरणचौथे

समकालीन निवडक बालसाहित्यिकारांच्या नाटक व कादंबरी साहित्याचा अभ्यास

या प्रकरणात समकालीन असणाऱ्या भा.दो.पाटिल , रत्नाकर मतकरी, स.ई.परांजपे सुर्यकांत सराफ बालसाहित्यिकाच्या १९८० ते आजतागायत बालनाटकव कादंबरी साहित्याचा अभ्यास करावयाचा आहे.

प्रकरण पाचवे

निवेदनतंत्र आणि भाषाशैली

या प्रकरणात समकालीन असणाऱ्या भगवान अंजनीकर, रेणु पाचपोर, सुरेश सावंत माधव चुकेवाड, देविदास फुलारी, बबन शिंदे, श.ल.नाईक, रमेश चिल्ले, बाबा भांड, केशव वसेकर,अनुताई वाघ, वृधा निमये, फ.मु.शिंदे, भा.दो.पाटिल , रत्नाकर मतकरी, स.ई.परांजपे सुर्यकांत सराफ बालसाहित्यिकाच्या १९८० ते आजतागायत (नाटक,कविता, कथा) भाषाशैली आणि (नाटक, कविता, कथा) निवेदनतंत्र यांचा अभ्यास करावयाचा आहे.

प्रकरण सहावे

निष्कर्ष

शेवटच्या सहाव्या प्रकरणात समकालीननिवडक बाल साहित्यीकारांनी १९८०प्रकाशित केलेल्या बाल कविता,बाल कथा, बाल नाटक आणि बाल कादंबरी अशा समग्र साहित्य लेखन वाड.मय प्रकारांच्या अभ्यासातून निष्कर्ष मांडण्यात येतील.

संदर्भग्रंथसूची

१) डॉ वसंतबिराजदारः आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद, आवृती १५ ऑगस्ट१९९९

२) प्रा.रा.ग. जाधवःसाहित्य, बदलते परिपेक्ष, पद्मगंधा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २४ऑगस्ट२०११.

३) आशुतोष पाटीलःकविता रती ची वाङ्मयीनकादंबरी, विजय प्रकाशननागपूर प्रथमावृती १६ जानेवारी २०१४

४) प्रा.रा.ग.जाधवःसाठोत्तरी मराठीकविता व कवी, संकेत प्रकाशनऔरंगाबाद,प्रथमावृती १९१७.

५) गो.म.कुलकर्णीःआधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी, मेहता प्रकाशन पुणे,प्रथमावृती,जानेवारी १९९४

६) डॉ मंदाखांडगे व डॉ. लीला दीक्षितःबालशिक्षण बालसाहित्य विविध आयाम, प्रतिमा प्रकाशन पुणे, प्रथमावृअती १९ ऑगस्ट २००६
७) प्रा.डॉ. वसंत शेकडे :निवडककविता, शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, प्रथमावृतीजून २०१५

मार्गदर्शक

डॉ.उज्वला शिवराम जगताप

संशोधक मार्गदर्शक व मराठी विभाग प्रमुख
शारदा महाविद्यालय, परभणी.

संशोधक

प्रा.सदाशिव गंगाधर चुकेवाड

बॅ. बाळासाहेब खर्डेकर महाविद्यालय,

वेंगुर्ला जि.सिंधुदुर्ग